# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

# प्रकरण पहिले

## प्रास्तविक

1.01 संशोधनाची पार्श्वभुमी

1.02 समस्येची निवड

1.03 समस्या विधान

1.04 संशोधनाची गरज व महत्व

1.05 संशोधनाची उद्दिष्टे

1.06 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

1.07 प्रकरणांचे नियोजन

संदर्भ

### 1.01 संशोधन समस्येची पार्श्वभूमी

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद हा नेहमीच भारताच्या राष्ट्रीय शिक्षण पध्दतीमधील एक अविभाज्य घटक मानण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षणाविषयक निवेदन सर्वप्रथम दादाभाई नौरोजी यांनी भारतीय शिक्षण आयोगापुढे (1882) साक्ष देताना केले. त्याचा पाठपुरावा व पुरस्कार गोपाळकृष्ण गोखले यांनी केला. त्यांनी 1910-1912 मध्ये, केंद्रसरकारने सर्व मुलांना चार वर्षांचे प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी पत्करली पाहिजे असा आग्रह विधिमंडळात धरला.

1919 च्या भारत सरकार कायद्यान्वे, प्रांतिक सरकारे स्थापन झाली. त्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा कायदा केला.प्राथमिक शिक्षणालाच महात्मा गांधीजींनी मूलोद्योगशिक्षणाची जोड दिली.

15 ऑगस्ट 1947 या दिवशी भारत स्वतंत्र झाला. 1947 मध्ये साक्षरतेचे प्रमाण अवघे 14% होते. 6-11 वयोगटातील तीन मुलांपैकी एकच शाळेत दाखल झालेले होते आणि 11-14 वयोगटातील अकरा मुलांपैकी एकच शाळेत जात असे. स्वातंत्र्यानंतर सतत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्यावर राष्ट्रीय नेतृत्वाचा भर राहिला.

सन 1950 मध्ये मुंबईचे तेंव्हाचे मुख्यमंत्री कै. श्री. बा. गं. खेर यांच्या अध्यक्षतेखाली खेर समिती नेमण्यात आली. या समितीने, 1960 पर्यंत प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करावे असे सूचविले. या सूचनेच्या राज्यघटनेच्या 45 व्या कलमात समावेश करण्यात आला.

घटनेच्या 45 व्या कलमानुसार सर्व मुलांना, ती चौदा वर्षांची होईतो, मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था सरकार राज्यघटना अंमलात आल्यापासून (1950) दहा वर्षामध्ये करील (1960) असे कलमात म्हटले होते. परंतु हे उद्दिष्ट आजपर्यंत ही साध्य झालेले नाही. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचा कालावधी सतत इ. स. 1965-66, 1986, 2000 पर्यंत वाढविण्यात आला.

1952 मध्ये नेमण्यात आलेल्या "माध्यमिक शिक्षण आयोगाने " प्राथमिक शिक्षण 7 किंवा 8 वर्षाचे (दोन विभागात 4+3 वर्षे किंवा 5+3 वर्षे ) असावे अशी शिफारस केली.

1964-66 मध्ये नेमण्यात आलेल्या 'कोठारी शिक्षण आयोगाने " निम्नप्राथमिक शिक्षणाचा टप्पा चार ते पाच वर्षाचा आणि उच्चप्राथमिक शिक्षणाचा टप्पा तीन वर्षाचा म्हणजे एकूण सात ते आठ वर्षाचा प्राथमिक शिक्षणाचा कालावधी सुचविला.

1968 च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार घटनेच्या 45 व्या कलमानुसार 14 वर्षापर्यंत सर्व मुलांना शिक्षण मिळण्यासाठी

आणि उच्चप्राथमिक शिक्षणाचा टप्पा तीन वर्षांचा म्हणजे एकूण सात ते आठ वर्षाचा प्राथमिक शिक्षणाचा कालावधी सुचविला.

1968 च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार घटनेच्या 45 व्या कलमानुसार 14 वर्षापर्यंत सर्व मुलांना शिक्षण मिळण्यासाठी कसून प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले. त्याचबरोबर शाळेतील गळती व स्थगिती थांबविण्यासाठी कार्यक्रम सुचविले.

1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक शिक्षणावर अधिक भर देण्यात आला. प्रत्येक शाळेत किमान सोयी उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्येक शाळेस कमीतकमी दोन खोल्या असतील . तेथे खेळणी, कला, नकाशे, तक्ते व इतर शैक्षणिक साहित्य असेल. प्रत्येक शाळेत दोन शिक्षक असतील. या योजनेस खडू–फळा मोहीम असे संबोधण्यात आले. ही मोहीम देशात लागू करण्यात आली.

1947 पर्यंतच्या प्राथमिक शिक्षणाच्या विकासाची दोन ठळक वैशिष्ट्ये आहेत *2

1) घटनेच्या 45 व्या कलमाप्रमाणे 6 ते 14 या सर्व वयोगटातील सर्व मुलांचे शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करावयाचे ह्या राष्ट्रीय उद्दिष्टाला प्राधान्यक्रम देण्यात आला.

2) शिक्षणपध्दतीचे स्वरुप असे बदलावयाचे की, त्यामुळे उत्पादकतेच्या मूलभूत गरजेला उत्तेजन मिळेल. ही प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे होती आणि ती जर साध्य झाली असती तर प्राथमिक शिक्षणात आमुलाग्र फरक दिसून आला असता. परंतु बराच प्रसार झाला तरी पहिले उद्दिष्ट साध्य झाले नाही. आणि दुसऱ्या उद्दिष्टात लक्षणीय फरक पडला नाही.

प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट आजपर्यंत पूर्ण होऊ शकले नाही . आत्तापर्यंत अपयश का आले या मागच्या कारणाचे विश्लेषण करुन गेली शंभर वर्षे आपण ठरविलेले राष्ट्रीय उद्दिष्ट प्रत्यक्षात येईल आणि लोकांना दिलेल्या अभिवचनाची पुर्तता होईल यासाठी काय केले पाहिजे हे ठरवायला हवे. त्यासाठी प्रत्येक कार्यपध्दतीत सामर्थ्याचे आणि उणीवांचे मुल्यमापन केले पाहिजे.संशोधकाला असे वाटते की, प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य न होण्यास असंख्य कारणे आहेत . त्यापैकीच प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन ही त्यांस कारणीभूत आहे .

प्राथमिक शिक्षणांसाठी सर्व कांही उपाययोजना करुनसुध्दा, स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात आपण प्राथमिक

शिक्षणाच्या सार्वत्रिक, मोफत, सक्तीच्या शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करु शकलो नाही.

स्वातंत्र्यानंतर 50 वर्षातही साक्षरतेचे प्रमाण 52.11% एवढेच आहे. त्यातही स्त्री साक्षरतेचे प्रमाण 39.4% एवढेच आहे. जर 6–14 वयोगटातील सर्वच मुलांना प्राथमिक शिक्षण मिळाले तर निरक्षर व्यक्ती राहणार नाही परंतु, आपण सर्वांना प्राथमिक शिक्षण देऊ शकलो नाहीत त्यामुळे निरक्षरता वाढली. निरक्षरता दूर करण्यासाठी मग संपुर्ण भारतात साक्षरता अभियान शासनात चालवावे लागले त्यावर कोट्यावधी रुपये खर्च झाले तरी निरक्षरता पूर्णपणे दूर करु झाली नाही. साक्षरता वाढवावयाची असेल तर फक्त प्राथमिक शिक्षणाचा कायदा करुन चालणार नाही. त्यासाठी अत्यंत परिश्रम करण्याची गरज आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षणाच्या विविध पैलूंचा व रागरंगांचा विचार करणे आवश्यक आहे.

त्यासाठी आजच भारतातील सर्वच 6–14 वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय केली नाही तर साक्षरता अभियान मोहीमेवर खर्च करावा लागणार नाही.

1.02 **समस्या निवड**

भारतीय घटनेच्या 45 व्या कलमाप्रमाणे " ही राज्यघटना अंमलात आल्यापासून 10 वर्षाच्या आत देशातील सर्व बालकांना त्यांच्या वयाची 14 वर्षे पूर्ण होईपर्यंत सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करील" अशी निसंदिग्ध ग्वाही देण्यात आली. या मार्गदर्शक तत्वानुसार 1960 पर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे उद्दिष्ट साध्य व्हायला हवे होते. परंतु विविधांगी आणि विविधस्तरीय प्रयत्नानंतरही आपण या उद्दिष्टापासुन दूर आहोत. *3

1968 मध्ये स्वतंत्र भारताने आपले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले. त्यात 1975 पर्यंत 14 वर्षे वयापर्यंत सर्व मुलामुलींना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचा निर्धार व्यक्त केला होता. त्यानंतर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी ठरवून घेतलेली ही कालमर्यादा इ.स. 1980, 1985, 1990 अशी वाढत गेली . 1980 मध्ये केंद्रशासनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहिर केले . त्यात 1995 पर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या 1992 च्या मसुद्यात ही कालमर्यादा इ.स. 2000 पर्यंत वाढविली आहे. *4

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमाला अग्रक्रम देण्यात आला कारण ज्या देशामध्ये लोकांना प्राथमिक शिक्षणाचा लाभ मिळाला आहे त्या देशामध्ये शेती , आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण आणि उद्योग या क्षेत्रात अधिक प्रगती झाली आहे.

मुक्तअर्थव्यवस्थेच्या या युगात शेती आणि उद्योग या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येईल असे मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टिने शिक्षणाचे महत्व वाढले आहे. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया असल्यामुळे त्याला सर्वोच्च प्राधान्य दयावे लागेल.

महाराष्ट्र शासनाने गेल्य दहा वर्षाच्या कालावधीत प्राथमिक शिक्षण, शालेय शिक्षण यासाठी समित्या व आयोग नेमले या समित्यांनी प्राथमिक शिक्षणाविषयी महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत . हे समित्या आणि आयोग अशा :-

तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे शिक्षण राज्यमंत्री श्रीमती पार्वतीबाई मलगोंडा यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली शालेय शिक्षण सुधार समिती (1984)

प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली पंचायत राज्य मूल्यमापन समिती (1986)

प्रा. राम मेघे यांच्या अध्यक्षत्खाली नियुक्त केलेली प्राथमिक शिक्षण आयोग. (1992)

श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य नियोजन मंडळाने " पूर्व प्राथमिक साक्षरता व माध्यमिक शिक्षण या विषयीचे धोरणात्मक प्रयत्न, त्यांचा प्रधान्यक्रम व अनुदाने ' याविषयी विचार करण्याकरिता नियुक्त केलेला अभ्यासगट (1993)

या समित्यांच्या शिफरशीमुळे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या अंमलबजावणीसाठी नवी दिशा मिळाली आहे.*5 1992-93 च्या आकडेवारीनुसार राज्यात 52,299 प्राथमिक शाळा होत्या . त्यात 2,82,000 शिक्षक शिकवत असून 1.10 कोटी विद्यार्थी शिकत होते. राज्यातील प्राथमिक शाळा प्रामुख्याने जिल्हा परिषदा (84.15%) आणि नगरपालिका / महानगरपालिका (7.35%) यांच्यामार्फत म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत (91.50 %) चालविल्या जातात. एकूण प्राथमिक शांळापैकी 7.78% शाळा खाजगी संस्थामारिफत चालविल्या जातात. परंतु त्यामध्ये 17.92 % विद्यार्थी शिक्षण घेतात. राज्यात काम करण्याऱ्या एकूण शिक्षकांमध्ये स्त्री शिक्षकांचे प्रमाण 38.26 % आहे. नगर पालिकेच्या शाळेमध्ये ते

40.82% आहे तर खाजगी शाळांमध्ये 60% पेक्षा जास्त आहे. जि. प. प्राथमिक शाळेत ते केवळ 25.70 % आहे .
किमान 200 लोकसंख्या असलेल्या प्रत्येक वाडी/ वस्तीसाठी दीड किलोमीटर अंतराच्या आत प्राथमिक शाळा उघडल्या आहेत.

सासर्व सोयी शिक्षणाच्या वाढत असताना, गळती व स्थगितीचे प्रमाण प्राथमिक शांळामध्ये वाढत आहे. ग्रामिण भागामध्ये 21% मुले व 33% मुली मध्येच शाळा सोडून जातात. ग्रामीण भगातील अनुसूचीत जमातीच्या 49% मुली शिक्षणात गोडी नसल्यामुळे शाळा सोडतात. आर्थिक कारणे आणि घरकाम यामुळे शाळा सोडुन जाणाऱ्या मुलांचे प्रमाण 50 % तर मुलींचे प्रमाण 38% आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण 68.39% आहे. त्यामध्ये स्त्रिया 39.16% आणि पुरुष 54.57 % आहे. म्हणजेच निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. शासनाने जाणीवपुर्वक प्रयत्न करुनही आजपर्यंत प्राथमिक शिक्षणाचे ध्येय साध्य करता आले नाही. त्यांची असंख्य कारणे असू शकतात. संशोधकाला असे वाटते की प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन हेसुध्दा यांस कारणीभुत आहे.

संशोधक स्वत: जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये कनिष्ठ अधिव्याख्याता म्हणून काम करीत आहे. सभोवतालच्या प्राथमिक शांळाकडे पाहिले असता, शाळेमध्ये शैक्षणिक बाबींवर भर न देता फक्त माहिती मागविण्यावरच वरिष्ठांचा भर असतो त्यामुळे शिक्षकांचे शैक्षणिक कामांकडे दूर्लक्ष होते.

लहान वयात होणारे संस्कार विद्यार्थ्यात त्याच्या भावी जीवनात उपयोगी पडतात. परंतू येथे तर लहानपणीच संस्कार व्यवस्थित होत नाहीत. त्यामुळे असंख्य समस्या प्राथमिक शिक्षणामध्ये निर्माण झाल्या आहेत. या बहुतांशी समस्या ह्या प्रशासनामुळे निर्माण झाल्या आहेत. असे संशोधकाला वाटते.

उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळा बहुतांशी जि. प. मार्फत चालविल्या जातात. प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनात गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक यांचा अंतर्भाव होतो. प्रशासनातील या प्रत्येक घटकांचा प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात महत्वाचा सहभाग आहे.

1.03 **समस्या विधान**

समस्या विधान खालील प्रमाणे आहे.

**" उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासानाचा चिकित्सक अभ्यास "**

**"A CRITICAL STUDY OF ADMINISTRATION OF PRIMARY EDUCATION IN OSMANABAD TALUKA "**

संशोधन म्हणजे शास्त्रशुध्द अभ्यास होय.

कोणत्याही विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास करताना संज्ञा विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात . संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा म्हणून संशोधनाच्या वरील विधानात वापरलेल्या महत्वाच्या संज्ञाच्या व्याख्या खालील प्रमाणे आहेत.

**उस्मानाबाद तालुका**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी त्याचे जिल्हा, तालुका व ग्रामस्तर असे गट पाडण्यात आले महाराष्ट्रातील 31 जिल्ह्यापैकी उस्मानाबाद हा जिल्हा आहे. यातच उस्मानाबाद तालुक्याचा समावेश होतो. उस्मानाबाद तालुक्याच्या चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत.

1) पूर्वेला :- औसा तालुका आहे.

2) पश्चिमेला :- बार्शी तालुका आहे.

3) दक्षिणेला :- तुळजापूर तालुका आहे.

4) उत्तरेला :- कळंब तालुका आहे.

या उस्मानाबाद तालुक्यात 125 गावांचा समावेश आहे. स. न. 1991 च्या जणगनणेनुसार उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्या 12,76,227 एवढी आहे उस्मानाबाद जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7569 चौ. कि. मी. आहे. उस्मानाबाद तालुक्याची लोकसंख्या 2,96,892 आहे.

**प्राथमिक शिक्षण** *6

6 ते 14 वयोगटातील मुलामुलींना दिले जाणारे, सार्वत्रिक सक्तीचे व मोफत शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. या

शिक्षणात कनिष्ठ प्राथमिक स्तर (1 ते 4) व उच्च प्राथमिक स्तर असे दोन भाग आहेत.

राज्य घटनेत 45 व्या कलमानुसार सार्वत्रिक, सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. मुख्यतः प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी जिल्हा परिषदाकडे सोपवण्यात आली आहे. शहरात प्राथमिक शिक्षण नगर पालिका व महानगरपालिका द्वारे देण्यात येते .

आज बऱ्याच ग्रामिण भागात व शहरात प्राथमिक शिक्षण देण्याचे काम खाजगी संस्था चांगल्या रितीने पार पाडीत आहेत.

**प्रशासन** *7

या संशोधनात प्रशासन हा शब्द शैक्षणिक प्रशासन या अर्थाने वापरला आहे.

" शैक्षणिक कृती, योजना. कार्यक्रम व सवलतीच्या बाबतीत मार्गदर्शन करणारी व दिर्घकालीन आणि व्यापक संदर्भात नेतृत्व पुरविणारी सामाजिक निती म्हणजे शैक्षणिक प्रशासन होय.

प्रशासनामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

1) शैक्षणिक नियोजन

2) प्रशासनातील निरनिराळ्या घटकांतील संबंध आणि सहकार्य

3) प्रशासनाचे विकेंद्रिकरण

4) वित्त व्यवस्था

5) प्रशासक, शिक्षक व कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण

6) महत्वाच्या साहित्याची तरतूद

7) संशोधनास आवश्यक बाबींची तरतूद

8) परिणामांचे मूल्यमापन

9) समाज व संस्था यातील सबंध

10) संस्थेतील व समाजातील निरनिराळ्या घटकांना प्रेरणा देणे, उत्तेजित करणे आणि कार्यप्रवण करणे.

11) शैक्षणिक नियोजनाला दयावयाची प्रसिद्धी

12) भविष्य काळाच्या स्वरुपा विषयीचा अंदाज बांधून त्या संबंधी मार्गदर्शन करणे

**चिकित्सक अभ्यास** * 8,9

प्रो. सी.व्ही. गुड यांच्या व्याख्येवरुन चिकित्सक अभ्यास म्हणजे " एखाद्या विषयाचा सविस्तर व संपूर्ण अभ्यास " हा अभ्यास कौशल्यपूर्ण व निश्चित स्वरुपाचा असतो. ही अर्थपूर्ण चौकशी असते.

विविध संशोधन साधनांच्या साह्याने मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण, स्पष्टीकरण करुन प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनामध्ये सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शक सूचनांचा अविष्कार करणे.

1.04 **संशोधनाची गरज व महत्व** :-

प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे प्राथमिक शिक्षणामुळे समाजाचा एकूण दर्जाच उंचावतो. त्यासाठी प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन योग्य असणे आवश्यक आहे.

आज प्राथमिक शिक्षण निम्नप्राथमिक स्तर व उच्चप्राथमिक स्तर असे दोन टप्प्यावर देण्यात येते. बहुतांशी प्राथमिक शिक्षण (85%) जि. प. शाळांमार्फत देण्यात येते . शहरात हे काम नगरपालिका करतात . खाजगी संस्थेद्वारेही प्राथमिक शिक्षण दिले जाते.

गटशिक्षणाधिकारी हा तालुक्याचा प्राथमिक शिक्षणाचा प्रशासन प्रमुख म्हणून काम पाहतो. त्याच्या मदतीला शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख असतात . आज शिक्षणाचा प्रसार झाल्यामूळे शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या वाढलेली आहे. यासर्व शाळांचे प्रशासन पाहत असतानाच प्रौढशिक्षण, साक्षरता शिष्यवृत्तीपरीक्षा, नवोदय विद्यालय, शासनाने मागविलेली माहिती पाठविणे , पंचायत समिती मिटींगसाठी माहिती देणे , विविधखात्याच्या होणाऱ्या मिटींगसाठी उपस्थित राहणे. यामुळे आज गटशिक्षणाधिकारी यांना शैक्षणिक कांमासाठी लक्ष देण्यास , शाळेला भेटी देण्यास वेळच मिळत नाही. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे.

त्याचबरोबर शिक्षणविस्तार अधिकारी व केंन्द्रप्रमुखांचीही परिस्थीती तशीच आहे. त्यांनाही शैक्षणिक कामाशिवाय इतरच

कामे करावी लागतात त्यामुळे साहजिकच त्यांच्या प्रशासन व शैक्षणिक बाबींवर परिणाम होतो. त्यासाठी गटशिक्षणाधिकारी, विस्तारअधिकारी आणि केंद्रप्रमुख यांच्या प्रशासनातील अडचणी जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा सर्वात खालच्या स्तरावर मुख्याध्यापक, काम पाहतात. जि. प. शाळेकडील मुख्याध्यापकांची विविध अडचणी व समस्या आहेत.

मुख्याध्यापकांना बहुतेकवेळी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम पहावे लागते . बहुतांशी शाळेवर पुरेसे शिक्षक नाहीत . 90% शाळांना लिपिक व सेवक कर्मचारी नाहीत त्यामुळे लिपिकांची व सेवकांची सर्व कामे शिक्षक व विद्यार्थ्यांकडून करुन घ्यावी लागतात . बहुतेक शाळांना इमारत , क्रीडांगण नाही, असेल तर सुरक्षित नाही.

केंद्रीय शाळांकडून सतत मागविली जाणारी माहिती , वरिष्ठाकडून मागविली जाणारी माहिती यामुळे मुख्याध्यापक याच कामात गुंतून राहतात. त्याचबरोबर मुख्याध्यापक व शिक्षक यांना राष्ट्रीय कामे या नावाखाली लावली जाणारी विविध कामे उदा. पशुगणना , जणगणना , मतदार यादया करणे सर्वेक्षण करणे यामुळे शालेय प्रशासन सुरळीत चालु शकत नाही.
त्यासाठी शालेय प्रशासनाच्या विविध अडचणी जाणून घेणे आवश्यक आहे. यास्तव हे संशोधन होणे आवश्यक आहे. या संशोधनामुळे प्राथमिक शिक्षणाच्या विविध स्तरावर येणाऱ्या समस्यांचा व प्रशासनातील अडचणीचा अभ्यास करता येईल त्याचा शालेय अध्ययन –अध्यापनावर काय परिणाम होतो हे जाणून घेता येईल . त्याचबरोबर प्रशासन सुधारण्यासाठी उपाय सुचविता येतील.

या संशोधनामुळे ,घटनेच्या 45 व्या कलमानुसार 6 ते 14 या वयोगटातील मुलामुलींना सक्तीचे, मोफत व सार्वत्रिक शिक्षण देण्याचा राज्यघटनेने दिलेल्या आश्वासनाची थोड्या फार तरी प्रमाणात पूर्तता करता येईल .

या संशोधनामुळे प्राथमिक शिक्षणाच्या विविध स्तरावरील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी , केंद्रप्रमुख, व मुख्याध्यापक यांना प्रशासनात सुधारणा करण्यात येईल.

1.05 **संशोधनाची उद्दिष्टे** :-

संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत

1) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचे स्वरुप जाणून घेणे

2) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या (शाळांच्या) प्रशासनाचा अभ्यास करणे

3) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या विविध प्रशासन स्तरावरील समस्यांचा प्राथमिक शालेय अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासणे

4) प्राथमिक (शालेय ) शिक्षणाचे प्रशासन सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

**1.06 व्याप्ती व मर्यादा** :-

1) या संशोधनासाठी उस्मानाबाद तालुका हे भौगोलिक क्षेत्र निवडले.

2) या संशोधनात जिल्हा परिषद, नगरपालिका व खाजगी शाळेच्या प्रशासनाचा अभ्यास केला

3) या संशोधनामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनातील महत्वाचे घटक गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी , केंद्रप्रमु मुख्याध्यापक यांच्या पुरतेच मर्यादित आहे.

4) या संशोधनामध्ये जिल्हापरिषदांच्या 94 प्राथमिक शाळा नगरपालिकेच्या 24 शाळा आणि खाजगी संस्थाच्या शाळां यांच्या प्रशासनाचा विचार करण्यात येईल.

5) हे संशोधन पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग चालवित असलेल्या व पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग चालवित असलेल्या प्राथमिक शाळांच्या प्रशासनापूरते मर्यादित आहे.

6) या संशोधनामध्ये अनुदानित प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा अभ्यास केला आहे.

7) हे संशोधन सन 1995 – 97 पर्यंतच मर्यादित आहे.

## 1.07 प्रकरणाचे नियोजन

प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणाचे नियोजन खालीलप्रमाणे केले आहे.

### प्रकरण पहिले

पहिल्या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी , समस्येची निवड , समस्येचे शब्दांकन , संशोधनाची उद्दिष्टे , समस्येचे महत्व ,गरज, व्याप्ती, व मर्यादा याबाबत स्पष्टीकरण केलेले आहे.

### प्रकरण दुसरे

दुसऱ्या प्रकरणात संबंधित साहित्याचा अभ्यास करण्यात आला . संशोधनावर आधारित इतर संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला. संबंधित संशोधनाचे समालोचन करण्यात आले. इतर संदर्भ साहित्याचे प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन या संदर्भात समालोचन करण्यात आले आहे.

### प्रकरण तिसरे

तिसऱ्या प्रकरणात प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनातील तात्विक घटकांवर स्पष्टीकरण करम्यात आले आहे. प्राथमिक शाळांचे कार्यालयीन कामकाज , विद्यार्थीसंख्या , अभ्यासक्रम, अध्यापक , शैक्षणिक साधने, इमारत, फर्निचर , अनुदान व प्राथमिक शिक्षणाच्या शसकीय योजना या संर्दभात प्राथमिक शाळांच्या प्रशासनातील तात्विक घटकांवर स्पष्टीकरण करण्यात आले.

### प्रकरण चौथे

चौथ्या प्रकरणात संशोधनाची पूर्वतयारी , नमुना निवड संशोधनाची साधने . प्रश्नावली. मुलाखतीसाठीची प्रश्नसूची, संशोधनाची कार्यपध्दती , भेटी व निरीक्षणे याबाबतचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

### प्रकरण पाचवे

पाचव्या प्रकरणात संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि विशदीकरण केलेले आहे. प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी, व गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत गेळालेल्या माहितीचे वर्गीकरण , विश्लेषण, आणि विशदीकरण करण्यात आले आहे.

## प्रकरण सहावे

सहाव्या प्रकरणात मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी, व गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या माहितीवरुन केलेल्या विशदीकरणाच्या साह्याने निष्कर्ष काढण्यात आले आहेत. या निष्कर्षाच्या साह्याने शिफारशी करण्यात आल्या आहेत व पुढील संशोधनासाठी विषय सूचविण्यात आले आहेत.

# संदर्भ


1) ज. पा. नाईक :- भारतातील प्राथमिक शिक्षण

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन 1980

पुणे 29

पृ. क्र. 7, 8,11

2) डॉ. न. रा. पारसनीस :- स्वातंत्र्योत्तर भरतीय शिक्षण,

नूतन प्रकाशन पुणे– Dec. 1994

पृ. क्र. 98

3) लीला पाटील :- आजचे शिक्षण आजच्या समस्या,

श्री विद्या प्रकाशन पुणे. 1985

पृ. क्र 30, 31, 98

4) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद :- जीवन शिक्षण

म.रा.शै.सं.व प्र.परिषद,

पुणे. डिसेंबर 1995

पृष्ठ क्रमांक – 6,7,8

5) शालेय शिक्षण विभाग मंत्रालय :- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

आणि साक्षरता कार्यक्रम

शालेय शिक्षण विभाग मंत्रालय,

मुंबई – 32

पृष्ठ क्रमांक 1 ते 6

6) लीला पाटील :- आजचे शिक्षण आजच्या समस्या,
श्री विद्या प्रकाशन पुणे. 1985

पृ. क्र 30 ते 35

7) एस.डी.तान्हणकर :- शैक्षणिक प्रशासन व नियोजन
नुतन प्रकाशन पुणे
पृष्ठ क्र. 1 ते 6

8) श्री. ना. बनहट्टी व भाऊ धर्माधिकारी :- सुगम मराठी शब्दकोश
सुविचार प्रकाशन मंडळ,
पुणे 1968
पृष्ठ क्रमांक. 166

9) प्र. न. जोशी :- आदर्श मराठी शब्दकोश भाग -1
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
पुणे - 1969
पृ. क्र. 39